दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

रेड बुलवर FSSAI ची कारवाई, 'एनर्जी ड्रिंक' लेबलवरुन नोटीस

मुंबई : प्रसिद्ध सॉफ्ट ड्रिंक ब्रँड रेड बुलला (Red Bull) भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (FSSAI) नोटीस बजावली आहे. रेड बुलमधील साखरेचे प्रमाण जास्त असल्याबद्दल चिंता व्यक्त करत त्याच्या 'एनर्जी ड्रिंक' या लेबलवर आक्षेप घेण्यात आला आहे. हे लेबल लोकांना अतिरिक्त साखरेचे जास्त सेवन करण्यास प्रवृत्त करू शकते, असे FSSAI चे म्हणणे आहे. रेड बुलला सात दिवसांत उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे. 'एनर्जी ड्रिंक' हा शब्द का वापरू नये, याबाबत स्पष्टीकरण मागण्यात आले आहे.

दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घाला : अश्विनी वैष्णव

मुंबई : सोशल मीडिया अधिक जबाबदार करण्यासाठी आणि तक्रारींच्या निवारणासाठी प्रभावी यंत्रणा तयार करण्यासाठी समाजात सखोल विचारमंथन व्हावे, असे आवाहन सरकारने केले आहे. सोशल मीडिया समाजाला मजबूत बनवण्यात योगदान द्यावे, त्याला कमकुवत किंवा विभाजित करू नये, यासाठी नागरिक समाज, बुद्धिजीवी आणि डिजिटल प्लॅटफॉर्म चालकांनी एकत्र येऊन आराखडा तयार करावा, असे केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

"युद्धजन्य सागरी क्षेत्रातून भारतीय जहाजांना बाहेर काढण्यासाठी खंबीर!" - कृष्णा स्वामीनाथन



नवी दिल्ली : जगभरात सागरी तणाव वाढत असताना, होर्मुझ सामुद्रधुनीजवळ भारतीय नौदलाने आपल्या युद्धनौका का तैनात केल्या आहेत, याचे नेमके कारण नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी सोमवारी स्पष्ट केले. सध्या एखाद्या युद्धभूमीचे स्वरूप आलेल्या या सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या भारतीय व्यापारी जहाजांना धीर देणे, त्यांना गरज पडेल तेव्हा तात्काळ मदत पुरवणे आणि संकटातून सुरक्षितपणे बाहेर काढणे, हाच या तैनातीमागचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. राजधानी नवी दिल्लीत पार पडलेल्या 'एएनआय नॅशनल सिक्युरिटी समिट ३.०' मध्ये बोलताना ॲडमिरल स्वामीनाथन यांनी भारतीय नौदलाच्या या मोहिमेची माहिती दिली. ते म्हणाले की, 'ऑपरेशन ऊर्जा सुरक्षा' अंतर्गत नौदलाने उत्तर अरबी समुद्रात युद्धनौका तैनात केल्या आहेत. यातील एक विशेष युद्धनौका थेट ओमानच्या आखाताच्या प्रवेशद्वाराशी तैनात करण्यात आली आहे. ही युद्धनौका या भागातील प्रत्येक सागरी हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवते आणि होर्मुझ सामुद्रधुनीतून बाहेर पडणाऱ्या भारतीय जहाजांना मार्गदर्शन व मदत करते. कोणत्याही संकटाच्या वेळी तात्काळ धावून जाता यावे, यासाठी ही युद्धनौका तिथे अहोरात्र गस्त घालत असते. या मोहिमेचा अनुभव सांगताना नौदल प्रमुख पुढे म्हणाले, "आतापर्यंत अनेक भारतीय जहाजांनी मदतीसाठी संपर्क साधला आहे. भारतीय नौदल त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, हा विश्वास देण्यासाठी आम्ही तिथे आहोत. जेव्हा ही जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीतून बाहेर पडतात, तेव्हा युद्धजन्य परिस्थिती असलेल्या या धोकादायक क्षेत्रातून आम्ही त्यांना संरक्षण देत सुखरूप बाहेर काढतो."

अमृता सुभाष, संदेश कुलकर्णी यांचा होणार सन्मान!



मुंबई : महाराष्ट्राच्या समृद्ध लोककलेचा वारसा जपणाऱ्या आणि कला क्षेत्रात आपल्या योगदानाने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या मान्यवरांचा लवकरच सन्मान करण्यात येणार आहे. लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी प्रदान करण्यात येणाऱ्या 'मृद्गंध पुरस्कार 2026'साठी यंदा विविध क्षेत्रांतील मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये अभिनेत्री अमृता सुभाष, अभिनेते आणि दिग्दर्शक संदेश कुलकर्णी यांच्यासह अनेक दिग्गजांचा समावेश आहे. लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या 16व्या स्मृतिदिनानिमित्त 16व्या लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, 26 नोव्हेंबर रोजी ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन येथे सायंकाळी 6 वाजता हा सोहळा पार पडणार आहे. विठ्ठल उमप फाऊंडेशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात 'मृद्गंध पुरस्कार 2026' प्रदान केले जाणार आहेत. विशेष म्हणजे, या कार्यक्रमासाठी रसिकांना विनामूल्य प्रवेश असणार आहे.

छत्रपती शाहू महाविद्यालयातील उत्तरपत्रिका तपासणी गैरव्यवहार प्रकरणी 48 जणांविरुद्ध गुन्हा दाखल

लासूर स्टेशन : लासूर स्टेशन येथील छत्रपती शाहू महाविद्यालयातील उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेत अनियमितता झाल्याप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिकच्या फिर्यादीवरून कॅप सेंटर संचालक,महाविद्यालयाचे प्राचार्य, तांत्रिक सहाय्यक, प्राध्यापकांसह एकूण 48 जणांविरुद्ध शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात प्रा. मधुकर साठे (कॅप सेंटर संचालक), प्राचार्य डॉ.संदीप राजाभाठ चिरडे,दादासाहेब कन्हाळे (तांत्रिक सहाय्यक), अंकुश गंगाराम पडाळे, प्रा. विशाल अशोकराव चपटे यांच्यासह अन्य 43 जणांचा आरोपींमध्ये समावेश आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे उपकुलसचिव मनोज नारायण घंटे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, 9 जून ते 4 जुलै 2025 या कालावधीत उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेत गैरप्रकार करण्यात आला. अधिकृत परीक्षकांची बायोमेट्रिक उपस्थिती घेऊन उत्तरपत्रिका तपासणीची लिंक उघडण्यात आली. त्यानंतर बनावट आयडीचा वापर करून अधिकृत शिक्षक प्रत्यक्ष केंद्रावर उपस्थित नसतानाही उत्तरपत्रिका तपासणी करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

'आम्ही तुम्हाला शोधून काढू'; इराणकडून दोन अमेरिकन नौदल अधिकाऱ्यांना थेट धमकी



मुंबई - इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव पुन्हा एकदा टोकाला पोहोचला आहे. इराणने अमेरिकन नौदलातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना उघडपणे धमकी दिली आहे. दक्षिण आफ्रिकेतील इराणच्या दूतावासाने सोशल मीडियावर पोस्ट करून या दोन्ही अधिकाऱ्यांना शोधून काढण्याचा इशारा दिला आहे. इराणच्या दूतावासाने 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक जुनी पोस्ट पुन्हा शेअर केली. त्यावर केवळ चार शब्द लिहिले होते - 'आम्ही तुम्हाला शोधून काढू.' या पोस्टमध्ये दोन अमेरिकन अधिकाऱ्यांना गुन्हेगार म्हणून संबोधण्यात आले होते. हे दोन्ही अधिकारी कोण आहेत, याची माहितीही दूतावासाने दिली आहे. कमांडर ली आर. टेट हे यूएसएस स्प्रान्स या युद्धनौकेचे कमांडिंग ऑफिसर आहेत, तर लेफ्टनंट कमांडर जेफ्री ई. यॉर्क हे त्याच युद्धनौकेचे कार्यकारी अधिकारी आहेत.

२९ मार्चच्या पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला होता की, या दोन अधिकाऱ्यांनी तीन वेळा टोमाहॉक क्षेपणास्त्रे डागण्याचे आदेश दिले होते. फेब्रुवारी महिन्यात इराणविरोधात अमेरिका आणि इस्रायल यांच्यात संघर्ष सुरू झाल्यानंतर अमेरिकेचे एक क्षेपणास्त्र मिनाब येथील शजरे तैय्यबेह शाळेवर कोसळले होते. या हल्ल्यात १२३ मुलांसह किमान १६८ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा इराणकडून करण्यात येत आहे. याच हल्ल्यासाठी या दोन्ही अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला अमेरिकन अधिकाऱ्यांवर हल्ला न करण्याचा इशारा दिल्यानंतर अवघ्या एका दिवसात इराणकडून ही धमकी आल्याने खळबळ उडाली आहे. अलीकडेच एका मुलाखतीत ट्रम्प यांनी इराणला इशारा देताना म्हटले होते की, जर एखाद्या वरिष्ठ अमेरिकन अधिकाऱ्याची हत्या झाली, तर इराणचे अस्तित्व फार काळ टिकणार नाही.

दरम्यान, आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांना तेहरानशी संबंधित व्यक्तींकडून सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव त्यांना वॉशिंग्टनमधील त्यांच्या निवासस्थानावरून हलवून एका लष्करी तळावर ठेवण्यात आले आहे. इराणच्या या नव्या धमकीमुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही या घटनेकडे लक्षपूर्वक पाहिले जात आहे.

ट्रम्प यांच्या दौऱ्याला फिलिपिन्समध्ये विरोध; मनिलाच्या रस्त्यांवर आंदोलकांचा गोंधळ



फिलिपिन्सची राजधानी मनिला रविवारी आंदोलनाने हादरली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रस्तावित दौऱ्याला विरोध करण्यासाठी शेकडो आंदोलक रस्त्यावर उतरले. आसियान शिखर परिषदेच्या ठिकाणाकडे निघालेला हा मोर्चा पोलिसांनी अडवल्यानंतर परिस्थिती चिघळली आणि दोन्ही बाजूंमध्ये जोरदार धक्काबुक्की झाली. काही काळ मनिलाच्या रस्त्यांवर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आसियान देशांच्या नेत्यांची 49 वी शिखर परिषद सध्या मनिलात सुरू आहे. जगभरातील प्रमुख नेते या परिषदेसाठी फिलिपिन्समध्ये दाखल होत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर ट्रम्प यांच्या दौऱ्याविरोधात हे आंदोलन करण्यात आले.

फिलिपिन्समध्ये लोकशाही, सामाजिक न्याय आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या विविध संघटना एकत्र येऊन 'न्यू पॅट्रियॉटिक अलायन्स' या नावाने आघाडी तयार करण्यात आली आहे. या आघाडीच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी शिखर परिषदेच्या ठिकाणापर्यंत जाण्याचा निर्धार केला होता. सकाळपासूनच आंदोलक मनिलाच्या मुख्य रस्त्यांवर जमू लागले होते. हातात फलक, झेंडे आणि घोषणाबाजी करत ते पुढे सरकत होते. मात्र शिखर परिषदेच्या ठिकाणाजवळ पोहोचताच पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावून मोर्चा अडवला.

सध्या अमेरिका आणि चीन यांच्यात जागतिक पातळीवर आपला प्रभाव वाढवण्यासाठी तीव्र स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे दक्षिण-पूर्व आशियाई देशांच्या भूमिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. फिलिपिन्स हा या स्पर्धेतील महत्त्वाचा देश मानला जातो. त्यामुळे ट्रम्प यांच्या दौऱ्याकडे केवळ द्विपक्षीय भेट म्हणून न पाहता जागतिक राजकारणाच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. फिलिपिन्सच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आसियान शिखर परिषदेच्या मुख्य बैठका संपल्यानंतर मंगळवारी दुपारी ट्रम्प हे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यासोबत मनिलात दाखल होण्याची अपेक्षा आहे. याच वेळी मार्कोस आसियान संघटनेचे वार्षिक अध्यक्षपद सिंगापूरकडे सोपवणार आहेत.

गोल्डी ढिल्लनची अमिताभ बच्चन यांना धमकी; मुंबईत 200 साथीदार सक्रिय असल्याचा दावा!


मुंबई : बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन आणि त्यांचा मुलगा अभिषेक बच्चन यांना जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. गँगस्टर गोल्डी ढिल्लन याने सोशल मीडियावर पोस्ट टाकून ही धमकी दिल्याचा दावा केला जात आहे. दिल्ली पोलिसांनी त्याच्या दोन साथीदारांना अटक केली असली तरीही मुंबईतील कट थांबलेला नाही, असे त्याने म्हटले आहे.या पोस्टमध्ये ढिल्लनने म्हटले आहे की, विकास ठाकूर आणि दीपक सिंग यांच्या अटकेने काहीही फरक पडणार नाही. मुंबईत त्याचे जवळपास २०० साथीदार सक्रिय असून ते तयार आहेत. शीख समाजाविरोधात बोलणाऱ्यांना सोडणार नाही, असेही त्याने म्हटले आहे.

त्याने विशेषतः अमिताभ बच्चन आणि अभिषेक बच्चन यांची नावे घेत बुलेटप्रूफ काचही त्यांना वाचवू शकणार नाही, अशी धमकी दिली आहे. मात्र, या पोस्टची सत्यता अद्याप स्वतंत्रपणे तपासली गेलेली नाही. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने काही दिवसांपूर्वी लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित दोन कथित शूटर्सना अटक केली होती. अमिताभ बच्चन यांच्या मुंबईतील जलसा या निवासस्थानाबाहेर गोळीबार करण्याचा कट असल्याचा संशय पोलिसांना आहे. याच तपासात दिल्लीतील एका व्यावसायिकाला खंडणीसाठी गोळी मारण्याच्या कटाचाही उलगडा झाला आहे.पोस्टमध्ये ढिल्लनने १९८४ च्या शीखविरोधी दंगलीचा उल्लेख केला आहे. त्या हिंसाचाराला जबाबदार असलेल्यांना कधीही माफ केले जाणार नाही, असे त्याने म्हटले आहे.

जगात कुठेही असले तरी शीख समाजाविरोधात वक्तव्य करणाऱ्यांना जाब विचारला जाईल, असा दावा त्याने केला आहे."कितीही बुलेटप्रूफ केबिन बांधल्या तरी त्यांना गोळी घातली जाईल," असे या पोस्टमध्ये म्हटले आहे.अटक करण्यात आलेले दोघे जण पंजाबमधील आहेत. विकास ठाकूर उर्फ विक्की हा जालंधरचा रहिवासी असून दीपक सिंग उर्फ दीप हा तरण तारणचा रहिवासी आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, विकासला दिल्लीतील व्यावसायिकावर गोळीबार करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. तो मुंबईहून दिल्लीत आला होता, तर दीपक नंतर त्याला सामील होणार होता.गेल्या महिन्यात अमिताभ बच्चन यांच्या जलसा बंगल्याला तीन वेळा बॉम्बच्या धमकीचे ई-मेल आले होते.

देशात डिजिटल जनगणनेचा नवा अध्याय; 4 राज्यात आजपासून स्वयं-गणनेला सुरुवात, तर 1 डिसेंबरपासून घरोघरी जाऊन सर्वेक्षण!

मुंबई : देशाच्या जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्याला 16 नोव्हेंबर 2026 पासून सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंड या चार राज्यांतील हिमक्षेत्र नसलेल्या भागांमध्ये ऑनलाइन 'स्वयं-गणना' प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या राज्यांतील नागरिक 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत आपल्या कुटुंबाचा तपशील ऑनलाइन सादर करू शकतात.लोक घरी बसून आपल्या मोबाईल फोन किंवा संगणकावरून कुटुंब आणि घरासंबंधी माहिती ऑनलाइन भरू शकतील. या चार राज्यांमध्ये ऑनलाइन स्वयं-गणनेची मुदत संपल्यानंतर 1 डिसेंबर 2026 ते 4 जानेवारी 2027 या कालावधीत जनगणना प्रतिनिधी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन नोंदणी करतील. त्यानंतर 5 जानेवारी ते 9 जानेवारी 2027 दरम्यान पुनरावलोकन फेरी पार पडेल.



ऑनलाइन स्वयं-गणना कशी करावी?

आता रांगेत उभे राहण्याची किंवा कागदपत्रांची चिंता करण्याची गरज नाही, कारण जनगणना 2027 पूर्णपणे डिजिटल स्वरूपात होत आहे. विशेष म्हणजे, 16 भारतीय भाषांमध्ये घरबसल्या ऑनलाइन स्वयं-गणना करण्याची सोय उपलब्ध झाली आहे. यासाठी नागरिकांनी फक्त se.census.gov.in या अधिकृत पोर्टलवर जाऊन आपला मोबाईल क्रमांक आणि प्राथमिक माहिती टाकून लॉग इन करायचे आहे. त्यानंतर कुटुंब आणि सदस्यांच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित 40 प्रश्नांची अचूक उत्तरे द्यायची आहेत. ही माहिती सबमिट होताच तुम्हाला एक विशेष 'स्वयं-गणना आयडी' मिळेल. जेव्हा जनगणना कर्मचारी तुमच्या घरी येतील, तेव्हा फक्त हा आयडी त्यांना दाखवून तुमची प्रक्रिया पूर्ण करायची आहे.

काही कारणास्तव तुम्ही ऑनलाइन स्वयं-गणना करू शकला नाहीत, तर काळजी करण्याचे कारण नाही. अशा कुटुंबांची नोंदणी जनगणना कर्मचाऱ्यांच्या नियमित घरोघरी होणाऱ्या सर्वेक्षणाद्वारे पूर्ण केली जाईल. जनगणना कायदा, 1948 नुसार संकलित केलेली प्रत्येक माहिती अत्यंत गोपनीय ठेवली जाते आणि तिचा वापर केवळ देशाच्या विकासाचे नियोजन व सांख्यिकीय अभ्यासासाठीच होतो. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता या राष्ट्रीय उपक्रमात उत्साहाने सहभागी व्हावे आणि घरी येणाऱ्या गणकांना संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

महाराष्ट्रात जनगणना कधी होणार? : महाराष्ट्रासह देशातील उर्वरित राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जनगणनेचा दुसरा टप्पा जानेवारी 2027 मध्ये सुरू होईल. या राज्यांमध्ये 10 ते 24 जानेवारी 2027 दरम्यान नागरिकांना ऑनलाइन स्वयं-गणनेची सुविधा उपलब्ध असेल.

देवेंद्र फडणवीस यांची 13 व्या राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड



मुंबई : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'भारत स्काउट्स अँड गाईड्स'च्या १३ व्या राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. तर निवृत्त आयएएस अधिकारी के. के. खंडेलवाल यांची संस्थेच्या मुख्य राष्ट्रीय आयुक्तपदी निवड झाली आहे. १५ नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मुख्यालयात, भारत स्काउट्स अँड गाईड्सच्या राष्ट्रीय परिषदेच्या ७६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान निवडणुका पार पडल्या. निवडणूक प्रक्रिया रीतसर गठीत केलेल्या निवडणूक मंडळामार्फत पार पडली. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि मुख्य राष्ट्रीय आयुक्त या पदांसाठीचे सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले, त्यासाठी कोणत्याही स्पर्धेची किंवा मतदानाची आवश्यकता नव्हती.या बैठकीला वरिष्ठ पदाधिकारी, राष्ट्रीय परिषदेचे सदस्य आणि देशभरातील विविध राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यालयात आगमन झाल्यावर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये बँड वादन, स्तंभांची कमान आणि मानवंदना यांचा समावेश होता. बैठकीला उपस्थित असलेल्या प्रतिनिधींचेही टिळा लावून पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. नवनिर्वाचित मुख्य राष्ट्रीय आयुक्त के. के. खंडेलवाल म्हणाले की भारत स्काऊट्स अँड गाईड्सने शिष्ट, जबादारी, नेतृत्व आणि सेवा या मूल्यांची रुजवण करून तरुणांचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

भारत स्काऊट्स अँड गाईड्स, हरियाणाचे राज्य आयुक्त प्रदीप कौशिक म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी आणि खंडेलवाल यांची मुख्य राष्ट्रीय आयुक्तपदी निवड होणे ही संस्थेसाठी एक महत्त्वपूर्ण घडामोड आहे.

'त्यांचे नेतृत्व या चळवळीला नवी ऊर्जा आणि दिशा देईल. आम्हाला विश्वास आहे की भारत स्काऊट्स आणि गाईड्स आपली व्याप्ती आणखी वाढवेल आणि शिस्त नेतृत्व, समाजसेवा व राष्ट्रउभारणी यांवर लक्ष केंद्रित असलेल्या उपक्रमांमध्ये अधिकाधिक मुलांना आणि तरुणांना सहभागी करून घेईल,' असे ते म्हणाले.

पंजाब निवडणुकीत भाजपकडून राघव चड्ढांना मोठी जबाबदारी



मुंबई : राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांच्यावर भारतीय जनता पक्षाने महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. २०२७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पंजाब भाजपच्या जाहीरनामा समितीवर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत 'आप' सोडलेल्या इतर पाच राज्यसभा खासदारांना पक्षाच्या जाहीरनामा आणि आरोपपत्र समित्यांवर स्थान देण्यात आले आहे. पक्षाच्या कार्यालयाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार पंजाब भाजपचे अध्यक्ष केवल सिंग ढिल्लन यांनी दोन राज्यस्तरीय समित्या स्थापन केल्या आहेत. येत्या काही दिवसांत आणखी समित्यांची घोषणा केली जाईल, असे ढिल्लन म्हणाले. भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार अविनाश राय खन्ना जाहीरनामा समितीचे अध्यक्ष असतील. मनप्रीत सिंग बादल, अश्वनी शर्मा, मनोरंजन कालिया, सोम प्रकाश, राणा गुरमित सिंग सोधी, अश्वनी सेखरी, सतनाम सिंग संधू, राघव चड्ढा, राजिंदर गुप्ता, हरभजन सिंग, परमपाल कौर आणि एचएस फुलका हे त्याचे अन्य १२ सदस्य आहेत.

राज्य युनिटचे प्रमुख म्हणून केवल ढिल्लन यांचे पूर्ववर्ती माजी खासदार सुनील जाखड आरोपपत्र समितीचे अध्यक्ष असतील. इकबाल सिंग लालपुरा, विजय सांपला, श्वेत मलिक, प्रणित कौर, रवनीत सिंग बिट्टू, दिनेश बब्बू, सुशील रिंकू, गेज्जा राम, विक्रमजीत सिंग साहनी, अशोक मित्तल, संदीप पाठक, एसएस चन्नी आणि जगमीत सिंग ब्रार हे त्याचे अन्य १३ सदस्य आहेत. राघव चड्ढा, उद्योगपती राजिंदर गुप्ता आणि माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग हे जाहीरनामा समितीवर आहेत.

तर संदीप पाठक आणि उद्योगपती अशोक मित्तल व विक्रमजीत सिंग सहानी हे आरोपपत्र समितीवर आहेत. ही समिती पंजाबमध्ये भाजपाची बाजू मांडण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे.

पुढच्या वर्षीच्या सुरुवातीला निवडणुकांचा धुरळा! उत्तर प्रदेश, पंजाबसह 5 राज्यात होणार मतदान

वर्ष 2027 हे निवडणुकांचं वर्ष असणार आहे. कारण या वर्षात सात राज्यात निवडणुका होणार आहे. पण वर्षाच्या सुरूवातीला पाच राज्यात निवडणुकीचं बिगुल वाजणार आहे. तर वर्षाच्या शेवटी दोन राज्यात निवडणुका होतील. उत्तर प्रदेश, मणिपूर, पंजाब, उत्तराखंड आणि गोवा या पाच राज्यात वर्षाच्या सुरूवातीलाच निवडणुका होणार आहेत. या पाच राज्यांच्या निवडणुकांकडे मिनी लोकसभा म्हणून पाहिलं जात आहे. या निवडणुका राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. या निवडणुकीच्या माध्यमातून जनतेचा कल, नवी आघाड्या आणि 2029 लोकसभा निवडणुकीची रणनिती आखण्याचा प्रयत्न करतील. 2029 लोकसभा निवडणुकीपूर्वीचा राजकीय वातावरणाचा आणि पक्षांच्या ताकदीचा अंदाज या विधानसभा निवडणुकीतून मिळणार आहे. त्यामुळे जनादेशाचा कौल कोणत्या पक्षाच्या बाजूने आहे, हे या निवडणुकीत स्पष्ट होणार आहे. यात उत्तर प्रदेशसारखं मोठं राज्य असल्याने याचं महत्त्व आणखी वाढलं आहे. तसं पाहिलं तर या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा वरचष्मा आहे.

उत्तर प्रदेश विधानसभेत भाजपाचा वरचष्मा

उत्तर प्रदेश विधानसभेत भाजपाची सत्ता आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशात भाजपाची घट्ट पकड आहे. राज्यात तिसऱ्यांदा सत्ता स्थापनेसाठी भाजपाचा तयारी सुरू आहे. त्यामुळे विरोधकांना उत्तर प्रदेश निवडणुकीचा पेपर खूपच कठीण आहे. राज्यात विधानसभेच्या 403 जागा असून लोकसभेवर 80 खासदार निवडून जातात. त्यामुळे ही निवडणूक विधानसभेपुरता मर्यादीत नसून त्याचा राष्ट्रीय राजकारणावरही परिणाम दिसून येईल. त्यामुळे भाजपाने आतापासून रणनिती आखण्यास सुरू केली आहे. उत्तर प्रदेशमध्ये सलग तिसऱ्यांदा भाजपाची सत्ता आणण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. निवडणूक समन्वय, तिकीट वाटप, सोशल मीडिया रणनीती, विरोधी पक्षांच्या सार्वजनिक प्रसिद्धीच्या धोरणाला प्रत्युत्तर देणे या रणनितीवर काम सुरू झालं आहे. उत्तर प्रदेशमध्ये भाजप 256, समाजवादी पक्ष 100, अपना दल (एस) 13, राष्ट्रीय लोक दल 9, सुहेलदेव भारतीय समाज पार्टी 6, निषाद पार्टी 5, अपक्ष 3, काँग्रेस 2, जनसत्ता दल लोकतांत्रिक 2 जागा आहेत.

पंजाबमध्ये आपची सत्ता उलथणार!

पंजाबमध्ये आपची सत्ता असून भगवंत मान हे मुख्यमंत्री आहेत. पण राज्यात सत्ताविरोधी लाट, प्रादेशिक पक्ष आणि शेतकरी राजकारण या दृष्टिकोनातून निवडणुकीकडे पाहिले जाईल. त्यामुळे आपसाठी ही निवडणूक कठीण जाणार आहे. तर भाजपाने राज्यात निवडणुकीच्या दृष्टीने वेगाने पावलं उचलण्यास सुरूवात केली आहे. पंजाब भाजपचे प्रदेशाध्यक्ष केवल सिंग ढिल्लन यांनी राज्य जाहीरनामा समिती आणि राज्य आरोपपत्र समितीची स्थापना केली आहे.जाहीरनामा समितीत पंजाबचे माजी मंत्री, माजी आमदार, खासदार आणि पक्षाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह एकूण 13 सदस्य आहेत. या समितीत मनप्रीत सिंग बादल, अश्वनी शर्मा, मनोरंजन कालिया, सोम प्रकाश, राणा गुरमीत सिंग सोधी, अश्वनी सेखरी, सतनाम सिंग संधू, राघव चड्ढा, राजिंदर गुप्ता, हरभजन सिंग, परमपाल कौर आणि वकील एच.एस. फुलका यांचा समावेश आहे. आरोपपत्र समितीत पंजाब आणि राष्ट्रीय स्तरावरील अनुभवी नेत्यांसह एकूण 14 सदस्य आहेत.

मणिपूर, उत्तराखंड आणि गोव्यात भाजपा सत्ता राखणार!

उत्तर प्रदेश आणि पंजाबनंतर मणिपूर, उत्तराखंड आणि गोव्याकडे भाजपाचं लक्ष असणार आहे. या तिन्ही राज्यात भाजपाची सत्ता आहे. उत्तराखंडमध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपाने आपल्या रणनितीला सुरूवात केली आहे. राज्यात सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपाच्या जोर बैठका सुरू आहेत. दुसरीकडे, मणिपूर आणि गोव्यामध्येही भाजपाने सत्ता परत आणण्यासाठी मोर्चेबांधणी केली आहे. दरम्यान, या तिन्ही राज्यात विरोधी पक्षांमध्ये अंतर्गत कलह दिसून येत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

सराफा बाजारातील अस्थिरता आणि गुंतवणूकदारांची उत्सुकता

भारतीय संस्कृतीत आणि अर्थव्यवस्थेत सोने-चांदीला केवळ एक मौल्यवान धातू म्हणून नव्हे, तर सुरक्षित गुंतवणुकीचे आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. गेल्या काही दिवसांपासून सराफा बाजारात सोन्या-चांदीच्या किमतीत सुरू असलेल्या मोठ्या घसरणीमुळे सर्वसामान्य ग्राहक आणि गुंतवणूकदारांचे लक्ष वेधले गेले आहे. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईतील बाजारपेठेत २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,३६,८०० रुपयांवर, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १,२५,४०० रुपयांवर आला आहे. शुक्रवारीच्या तुलनेत २४ कॅरेट सोन्यामध्ये तब्बल १,६९० रुपयांची घट झाली असून, दुसरीकडे चांदीच्या दरातही तीन टक्क्यांहून अधिक घसरण होत प्रति किलो दर १.७१ लाख रुपयांवर पोहोचला आहे. ऐन लग्नसराई आणि सणासुदीच्या पार्श्वभूमीवर झालेली ही दरवाढ-घट ग्राहकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण करणारी ठरली आहे. सोन्या-चांदीच्या दरातील या अचानक बदलामागे देशांतर्गत कारणांपेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडी अधिक कारणीभूत आहेत. जागतिक स्तरावर अमेरिकन डॉलरची वाढती मजबुती, सरकारी रोख्यांवरील वाढता परतावा (बॉण्ड यील्ड्स), अमेरिकेतील व्याजदरांबाबतचे संकेत आणि भू-राजकीय अस्थिरता या घटकांचा थेट परिणाम सराफा बाजारावर होत आहे. डॉलर मजबूत झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याची मागणी आणि किमतींवर दबाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, सर्वसामान्य ग्राहकांच्या मनात 'दहा ग्रॅम सोन्याचा दर १ लाख रुपयांच्या पातळीपर्यंत खाली येणार का?' असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. मात्र, सध्याची १.३६ लाख रुपयांची पातळी पाहता १ लाखाचा टप्पा गाठण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेत अत्यंत मोठ्या उलथापालथी होणे आवश्यक आहे, जे सध्याच्या घडीला तरी अनिश्चित दिसते. सराफा बाजारातील ही अस्थिरता लक्षात घेता ग्राहकांनी आणि गुंतवणूकदारांनी केवळ दर घसरले म्हणून घाईघाईत कोणताही निर्णय घेऊ नये. सोने खरेदी करताना सोन्याची शुद्धता (हॉलमार्किंग), प्रत्यक्ष बाजारभाव, मेकिंग चार्जेस आणि इतर करांची संपूर्ण माहिती घेणे अत्यंत गरजेचे आहे. आगामी काळात आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार सोन्या-चांदीच्या दरांत पुन्हा चढ-उतार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे बाजारपेठेचा कल अभ्यासून आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करूनच पावले उचलणे शहाणपणाचे ठरेल.

कुलगाम येथे झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी लतीफ भट आणि त्याचा एक साथीदार ठार

कुलगाम : याच जिल्ह्यात गेल्या आठवड्यात झालेल्या हल्ल्यात सीआरपीएफचे तीन जवान जखमी झाले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी सांगितले की, लष्कर आणि इतर सुरक्षा दलांच्या मदतीने संपूर्ण परिसर सील करण्यात आला आहे. या चकमकीत लष्कराच्या जवळच्या सर्व तुकड्या आणि जम्मू काश्मीर पोलिसांचा विशेष कृती गट (स्पेशल ऑपरेशन ग्रुप) सहभागी झाले होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कुलगामचा रहिवासी असलेला भट हा पाकिस्तानी दहशतवाद्यांसोबत काम करत होता. तो भूमिगत कार्यकर्त्यांच्या जाळ्याच्या मदतीने दक्षिण काश्मीरमधील लपण्याच्या ठिकाणांदरम्यान फिरत असे. भट हा २०२६ मधील अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये आधीच सामील असल्याचे मानले जाते, ज्यामध्ये २२ जुलै रोजी अनंतनागच्या लाल चौक परिसरात एका पोलीस हवालदाराची हत्या आणि ३१ जुलै रोजी कुलगाममध्ये स्थलांतरित मजुरांची हत्या यांचा समावेश आहे.

कुलगाम हल्ल्याच्या २४ तासांच्या आत किश्तवार जिल्ह्यात बाबी चंद आणि यशपाल कुमार या दोन विशेष पोलीस अधिकाऱ्यांची दहशतवाद्यांनी हत्या केली. मिळालेल्या माहितीनुसार हे दोन्ही एसपीओ एका दहशतवादविरोधी कारवाईदरम्यान सैन्यात दाखल होण्यासाठी जात होते. सीआरपीएफचे विशेष महासंचालक संदीप खिरवार यांनी सोमवारी सांगितले की, गेल्या आठवड्यातील हल्ल्यानंतर दलाने जम्मू आणि काश्मीरमध्ये सतर्कता वाढवली आहे.

अजितदादांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करणे हीच खरी श्रद्धांजली!



पुणे: पुणे येथे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते स्वर्गीय अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण आणि प्रवेशद्वाराचे नामकरण आज करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कार्य एका पुतळ्याच्या चौकटीत मावणारे नाही, असे सांगितले. पुणे आणि बारामतीच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले कष्ट, दूरदृष्टी, प्रशासनावरील विलक्षण पकड आणि सर्वसामान्यांप्रती त्यांची असलेली आत्मीयता हे महाराष्ट्र कधीही विसरणार नाही. त्यांनी पाहिलेली विकासाची स्वप्ने आणि हाती घेतलेले प्रकल्प पूर्ण करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल, असे भावपूर्ण प्रतिपादन उपमुख्यमंत्री त्यांनी केले. पुणे जिल्हा परिषदेच्या आवारात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अजितदादांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याची वेळ आपल्यावर येईल, यावर आजही विश्वास बसत नाही. 28 जानेवारी हा महाराष्ट्रासाठी काळा दिवस ठरला. माझ्यापेक्षा वयाने आणि अनुभवाने मोठा असलेला भाऊ गमावल्याचे दुःख मनात कायम आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना, विकासकामांची पाहणी करताना एखाद्या वास्तूतील वायर बाहेर आली आहे का, रंगकाम अपूर्ण आहे का, याकडेही अजितदादा बारकाईने लक्ष द्यायचे.

प्रकल्पांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, हा त्यांचा आग्रह नेहमी असायचा. प्रशासनावरील त्यांची पकड आणि क्षेत्रातील अभ्यास इतका विलक्षण होता की, वरिष्ठ सनदी अधिकारीही त्यांच्या प्रश्नांसमोर निरुत्तर होत असत. कठोर निर्णय घेणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही त्यांची खासियत होती. विरोधी पक्षनेते असतानाही त्यांनी केवळ विरोधासाठी विरोध न करता विधायक सूचना केल्या.

गर्भसंस्कार ही काळाची गरज! संस्कारांची सुरुवात जन्मानंतर नव्हे, तर गर्भावस्थेपासून...

आजच्या काळात आपण मुलांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या करिअरसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी खूप मेहनत घेतो. चांगली शाळा, चांगले शिक्षण, चांगले वातावरण मिळावे, यासाठी पालकांची धडपड सुरू असते. पण या सगळ्याचा विचार करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे मुलांच्या आयुष्याची सुरुवात जन्मानंतर होत नाही, तर गर्भात असतानाच त्यांच्या विकासाचा प्रवास सुरू झालेला असतो.

म्हणूनच आजच्या बदलत्या जीवनशैलीत गर्भसंस्कार ही केवळ परंपरा नसून काळाची गरज बनली आहे.

नेमके गर्भसंस्कार म्हणजे काय?

गर्भसंस्कार म्हणजे गर्भवती महिलेवर कोणते तरी धार्मिक विधी करणे किंवा दिवसभर मंत्र ऐकवणे एवढाच त्याचा मर्यादित अर्थ नाही. आईचे शारीरिक आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, आहार, विचार, वर्तन, योग, प्राणायाम, संगीत, वाचन आणि कुटुंबातील वातावरण या सर्वांचा एकत्रित विचार म्हणजे गर्भसंस्कार.

आई आनंदी असेल, तिच्या मनावर अनावश्यक ताण नसेल, तिला कुटुंबाचा आधार असेल आणि तिची योग्य काळजी घेतली जात असेल, तर त्याचा गर्भावस्थेतील आरोग्यावर सकारात्मक परिणाम होण्यास मदत होते.

आपल्या वेद आणि पुराणांमध्येही गर्भसंस्काराचे महत्त्व सांगितले आहे.

आपली संस्कृती आणि प्राचीन ग्रंथ यांचा अभ्यास केला तर गर्भावस्था आणि गर्भाच्या संरक्षणाला किती महत्त्व दिले गेले होते, हे लक्षात येते.

अथर्ववेदाच्या शौनक संहितेतील पाचव्या काण्डातील २५ व्या सूक्तात गर्भधारणा आणि गर्भाच्या संरक्षणासाठी प्रार्थना करणारे मंत्र आहेत. त्यातील एक मंत्र असा आहे :

*गर्भं धेहि सिनीवालि गर्भं धेहि सरस्वति।
गर्भं ते अश्विनोभा धत्तां पुष्करस्रजा॥*
(अथर्ववेद ५.२५.३)

या मंत्रातून गर्भधारणा आणि गर्भाच्या रक्षणासाठी केलेली प्रार्थना दिसून येते. त्याचप्रमाणे ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १८४ व्या सूक्तात गर्भाच्या योग्य स्थापनेसाठी प्रार्थना करणारा मंत्र आहे.



*विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु।
आ सिञ्चतु प्रजापतिर्धाता गर्भं दधातु ते॥*
(ऋग्वेद १०.१८४.१)

या मंत्राचा भावार्थ असा की गर्भाची योग्य निर्मिती व्हावी, त्याचा विकास व्हावा आणि गर्भधारणेची प्रक्रिया निर्विघ्नपणे पूर्ण व्हावी, अशी प्रार्थना केली आहे.

यावरून गर्भधारणा आणि गर्भाचे संरक्षण ही बाब आपल्या वैदिक परंपरेत किती महत्त्वाची होती, हे लक्षात येते.

प्रल्हादाची कथा – गर्भातील संस्कारांचे सुंदर उदाहरण

श्रीमद्भागवत महापुराणाच्या सप्तम स्कंधातील सातव्या अध्यायात भक्त प्रल्हादाची कथा येते.

हिरण्यकश्यपू तपश्चर्येसाठी बाहेर गेलेला असताना त्याची पत्नी कयाधू गर्भवती होती. देवर्षी नारदांनी तिला आपल्या आश्रमात आश्रय दिला. त्या काळात नारद मुनींनी तिला भक्ती, धर्म आणि भगवंताच्या महत्त्वाचे ज्ञान सांगितले. प्रल्हादाने स्वतः पुढे सांगितल्याप्रमाणे, आईच्या गर्भात असतानाच त्याने नारदांचे उपदेश ऐकले होते.

या कथेतून गर्भावस्थेतील वातावरण आणि चांगल्या विचारांचे महत्त्व आपल्या लक्षात येते. ही कथा केवळ भक्तीची नाही, तर गर्भावस्थेतील संस्कारांविषयी आपल्या परंपरेत असलेल्या विचारांचीही आहे.

अभिमन्यूची कथा – ऐकण्याचे महत्त्व

महाभारतातील अभिमन्यूची कथा तर सर्वश्रुत आहे. अर्जुनाने सुभद्रेला चक्रव्यूहात प्रवेश करण्याची पद्धत सांगितली आणि गर्भातील अभिमन्यूने ती ऐकली, असे प्रचलित कथन आहे. मात्र बाहेर पडण्याची पद्धत सांगण्यापूर्वी सुभद्रेला झोप लागल्यामुळे अभिमन्यूला ती माहिती मिळाली नाही, असे या कथेत सांगितले जाते.

महाभारतात द्रोणपर्वात अभिमन्यूला चक्रव्यूहात प्रवेश करण्याचे ज्ञान होते, याचा उल्लेख आहे. गर्भात ऐकण्याचा हा विशिष्ट प्रसंग लोकप्रिय कथनपरंपरेत प्रसिद्ध आहे.

या कथेतून गर्भावस्थेतील ऐकण्याच्या आणि वातावरणाच्या महत्त्वाकडे आपले लक्ष वेधले जाते.

अष्टावक्र ऋषींची कथा – ज्ञानाचे महत्त्व

महाभारतातील वनपर्वात अष्टावक्र आणि त्यांचे वडील कहोड यांच्याशी संबंधित प्रसंग येतो. कहोड ऋषी वेदपठण करत असताना गर्भातील अष्टावक्रांनी त्यांच्या पठणातील चुका दाखवून दिल्या, असे या कथेत वर्णन आहे. पुढे अष्टावक्र हे महान ज्ञानी ऋषी म्हणून प्रसिद्ध झाले.

या कथा आपल्या प्राचीन साहित्याचा भाग आहेत. त्यांचा वैज्ञानिक पुरावा म्हणून नव्हे, तर गर्भावस्था, ज्ञान आणि संस्कार यांविषयी भारतीय परंपरेने व्यक्त केलेल्या श्रद्धा आणि विचार म्हणून विचार करणे अधिक योग्य ठरेल.

आयुर्वेदानेही गर्भिणीच्या आरोग्याला दिले विशेष महत्त्व

गर्भसंस्काराचा विचार करताना आयुर्वेदाचा उल्लेख केल्याशिवाय हा विषय पूर्ण होऊ शकत नाही.

चरक संहितेतील शारीरस्थानाच्या आठव्या अध्यायात गर्भधारणा, गर्भाची वाढ आणि गर्भिणी परिचर्या याविषयी मार्गदर्शन केले आहे. सुश्रुत संहितेतील शारीरस्थानातही गर्भाची निर्मिती आणि विकास यांचा सविस्तर विचार केलेला आहे.

आयुर्वेदामध्ये गर्भवती स्त्रीच्या आहार-विहाराला विशेष महत्त्व आहे. तिचे आरोग्य, आहार, विश्रांती, मानसिक स्थिती आणि दैनंदिन दिनचर्या यांचा विचार केला जातो. यालाच गर्भिणी परिचर्या असे म्हटले जाते.

आजही या संकल्पनेतील अनेक मूलभूत विचार महत्त्वाचे वाटतात. कारण आईचे आरोग्य चांगले असेल तर गर्भाच्या निरोगी वाढीसाठी पोषक परिस्थिती निर्माण होण्यास मदत होते.

गर्भसंस्कार आणि योग – आईसाठीही, बाळासाठीही महत्त्वाचे

गर्भावस्थेत योग्य मार्गदर्शनाखाली केलेला सौम्य योग, श्वसनाचे योग्य प्रकार, ध्यान आणि विश्रांती यामुळे गर्भवती महिलेला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्यास मदत होऊ शकते.

मात्र गर्भावस्थेतील प्रत्येक महिलेची प्रकृती, गर्भावस्थेचा टप्पा आणि वैद्यकीय परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे योगासने, प्राणायाम किंवा इतर कोणताही सराव करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला आणि प्रशिक्षित मार्गदर्शन आवश्यक आहे. सर्व योगप्रकार प्रत्येक गर्भवती महिलेसाठी योग्य असतातच असे नाही.

गर्भसंस्कार ही केवळ आईची जबाबदारी नाही!

अनेकदा गर्भसंस्कार म्हटले की सर्व जबाबदारी आईवरच टाकली जाते. प्रत्यक्षात तसे नाही. आईला आनंदी ठेवणे, तिच्या भावना समजून घेणे, तिच्या आहाराची व विश्रांतीची काळजी घेणे आणि तिला मानसिक आधार देणे ही संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे.

घरात सतत भांडणे, ताणतणाव आणि नकारात्मक वातावरण असेल, तर केवळ गर्भसंस्काराचे वर्ग लावून अपेक्षित बदल घडणार नाही. त्यासाठी कुटुंबातील प्रत्येकाने थोडे बदलणे गरजेचे आहे.

आईला आवडणारे संगीत, चांगले पुस्तक, निसर्गात थोडा वेळ, कुटुंबीयांशी मनमोकळा संवाद, पुरेशी झोप आणि संतुलित आहार या साध्या गोष्टीदेखील तिच्या आनंदात भर घालू शकतात.

गर्भसंस्कार म्हणजे महागडे वर्ग किंवा मोठे विधी नव्हेत. योग्य माहिती, योग्य आहार, सकारात्मक विचार, सुरक्षित योगाभ्यास आणि प्रेमळ कौटुंबिक वातावरण यांचा सुंदर संगम म्हणजे गर्भसंस्कार.

अर्थात, गर्भसंस्कार हा नियमित प्रसूतीपूर्व वैद्यकीय तपासणी, डॉक्टरांचा सल्ला, आवश्यक उपचार आणि पोषण यांचा पर्याय नाही. श्रद्धा आणि विज्ञान यांची योग्य सांगड घालणे हेच आजच्या काळातील खरे शहाणपण आहे.

शेवटी एवढेच...

आपण एखादे रोपटे लावतो तेव्हा त्याला चांगली माती, पाणी आणि सूर्यप्रकाश देतो. कारण त्याची वाढ योग्य व्हावी, ही आपली अपेक्षा असते. मग उद्याच्या पिढीचा पाया असलेल्या गर्भाची काळजी घेताना आपण किती जागरूक असायला हवे?

मुलांना मोठे झाल्यावर चांगले संस्कार देण्यापेक्षा त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीपासूनच प्रेम, सकारात्मकता आणि निरोगी वातावरण देण्याचा प्रयत्न करूया.

कारण प्रत्येक मूल हे केवळ एका कुटुंबाचे भविष्य नसते, तर ते उद्याच्या समाजाचा एक महत्त्वाचा भाग असते.

"निरोगी आई, आनंदी गर्भावस्था आणि प्रेमळ कौटुंबिक वातावरण... हीच सुदृढ व सुसंस्कृत पिढी घडवण्याची पहिली पायरी आहे."

गर्भसंस्कार ही एका बाळाच्या जन्माची तयारी नाही, तर एका सुंदर भविष्याची सुरुवात आहे!

वैद्य :- मुक्ता ढवळे
"आयुर्वेदतज्ज्ञ तथा योगप्रशिक्षिका"
(बीएएमएस, एमडी, डीएनएस)
८९७५३६०४८४

20 नोव्हेंबर रोजी वनामकृविचा 28 वा दीक्षांत समारंभ; दीक्षांत समारंभात 3114 स्नातकांना विविध पदवीने अनुग्रहीत करण्यात येणार

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला असून, त्यानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी माहिती दिली की, विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातील सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री. जिष्णु देव वर्मा यांच्या निर्देशानुसार (महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १८(१) मधील तरतुदींच्या अनुषंगाने) सदर दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि भूषविणार आहेत.

महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रति-कुलपती श्री. दत्तात्रय भरणे हे या समारंभास विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कृषी विज्ञान अकादमीचे (NAAS) सचिव तथा भाकृअप–भारतीय कृषी संशोधन संस्था (ICAR-IARI) चे माजी संचालक व माजी कुलगुरू पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंह हे या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून दीक्षांत अभिभाषण करणार आहेत.

महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला आणि बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री (परभणी जिल्हा) मा. ना. श्रीमती मेघनाताई बोर्डीकर तसेच वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री मा. ना. ॲड. श्री. आशिष जयस्वाल, पंदेकृविचे माननीय कुलगुरू डॉ शरद गडाख, मफुकृविचे माननीय कुलगुरू डॉ. विलास खर्चे, बासाकोकृविचे माननीय कुलगुरू डॉ संजय भावे, माफसुच्या माननीय प्रभारी कुलगुरू डॉ मनाली क्षीरसागर, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या माननीय प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. हेमलता बागला, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, यांच्यासह वनामकृविचे माजी कुलगुरू, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी राज्यसभा सदस्य मा. खा. अशोक चव्हाण, राज्यसभा सदस्य मा. खा. डॉ. अजित गोपछडे, राज्यसभा सदस्य मा. खा. डॉ. रामाराव वडकुते, लोकसभा सदस्य मा. खा. श्री. संजय जाधव, विधान परिषद सदस्य मा. आ. श्री. विक्रम काळे, विधान परिषद सदस्य मा. आ. श्री. सईद खान, विधान परिषद सदस्य मा. आ. डॉ. प्रतापसिंह पाटील, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य मा. आ. डॉ. राहुल पाटील, विधानसभा सदस्य मा. आ. श्री रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य मा. आ. श्री राजेश विटेकर, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य मा. आ. श्री. बालाजी कल्याणकर, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य मा. आ. श्रीमती श्रीजया चव्हाण, कृषि परीषदेचे उपाध्याक्ष मा. श्री. तुषार पवार, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य तथा भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) चे माजी उपमहासंचालक (कृषी शिक्षण) डॉ. आर. सी. अग्रवाल, महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे माननीय सचिव डॉ परिमल सिंग (भाप्रसे), कृषि परिषदेच्या महासंचालक माननीय श्री राहुल रंजन महिवाल (भाप्रसे), महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे माननीय आयुक्त श्री सुरज मांढरे, पद्मश्री श्री श्रीरंग (दादा) देवबा लाड, कृषि परिषदेचे सदस्य श्री जनार्धन कातकडे, भारतीय कृषि अनुसंधान संस्थेतील वरिष्ठ उच्च पदस्थ अधिकारी, आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

महाराष्ट्रात आणि मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ अत्यंत साध्या स्वरूपात आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दीक्षांत समारंभात सन २०२५ – २६ या शैक्षणिक वर्षातील विविध विद्याशाखेतील विविध पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी पूर्ण करणाऱ्या एकुण ३११४ स्नातकांना पदवी अनुग्रहीत करण्यात येणार आहे. यात आचार्य पदवीचे २९ पात्र स्नातक, पदव्युत्तर पदवीचे २९२ स्नातक व पदवी अभ्यासक्रमाचे २७९३ स्नातकांचा समावेश आहे.

याबरोबरच, कृषी व शेतीपूरक उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' (मानद) पदवीने तसेच 'कृषिरत्न' मानद उपाधीने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील प्रगतिशील शेतकऱ्यांना 'शेतकरी शास्त्रज्ञ पुरस्कार' आणि 'नाविन्यपूर्ण शेतकरी पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. यामध्ये महिला शेतकऱ्यांचाही समावेश असणार आहे.

२८ व्या दीक्षांत समारंभापर्यंत कृषि आणि सलग्न शाखेतील एकूण ७२१०१ स्नातकांचा समावेश आहे. याशिवाय, कृषी पदविका अभ्यासक्रमाची ६१,३८१ प्रमाणपत्रे तसेच उद्यानविद्या अभ्यासक्रमाची १,४२४ प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली आहेत. अशा प्रकारे, एकूण १,३४,९०६ कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीत विद्यापीठाने मोलाचे योगदान दिले आहे.

दीक्षांत समारंभात सन २०२५ – २६ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने व दात्यांनी निश्चित केलेल्यां सूवर्ण पदके, रौप्य पदके व रोख पारितोषिके पात्र स्नातकांना प्रदान करून मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. एकूण ६४ पदके आणि प्रमाणपत्रे वितरण करण्यात येणार आहेत. यामध्ये १४ विद्यापीठ सुवर्ण पदके, दात्यांकडून देण्यात येणारे १४ सुवर्ण पदके, १ रौप्य पदक आणि १० रोख पुरस्कार प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार असुन २५ पदव्युत्तर पदवी गुणवत्ता प्रमाणपत्रांचा समावेश आहे, अशी माहिती माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी दिली.

पदवी अनुग्रहीत करण्यात येणाऱ्या स्नातकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. ज्या पदवीधरांची नावे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेत सुचिबध्द असतील त्यांनाच दीक्षांत दिंडीत सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल. दीक्षांत समारंभाच्या यादीत नाव असणाऱ्या स्नातकांनीच कार्यक्रमास उपस्थित राहावे. या दीक्षांत समारंभाकारिता पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त विद्यापीठातील इतर विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी तसेच इतर मान्यवरांनी इतर मान्यवरांना हा समारंभ विद्यापीठाच्या युटूब **https:**//www.youtube.com/@vnmkv यावर पहाता येईल.

दीक्षांत समारंभास उपस्थित राहणाऱ्या आचार्य पदवी (पीएच.डी.) प्राप्त स्नातकांना तसेच सुवर्णपदके, रौप्यपदके, रोख पारितोषिके व प्रमाणपत्रांसाठी निवड झालेल्या स्नातकांना संबंधित पुरस्कार व पदवी प्रमाणपत्रे समारंभात प्रदान करण्यात येतील. तसेच, इतर सर्व स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे त्याच दिवशी संबंधित महाविद्यालये व विभागांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील.

दीक्षांत समारंभ वेळेवर सुरू होणार असल्यामुळे सर्व संबंधित स्नातकांनी वेळेच्या एक तास अगोदर विद्वत दिंडीत सहभागी होण्यासाठी कार्यक्रम स्थळी यावे.

दीक्षांत दिंडीत प्रत्यक्ष सहभागी होणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी, निमंत्रित मान्यवर, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वस्त्रसंहिता निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार, विद्यार्थी तसेच पुरुष अधिकारी व कर्मचारी यांनी पांढरा कुर्ता-पायजमा, तर विद्यार्थिनी तसेच महिला अधिकारी व कर्मचारी यांनी क्रीम रंगाचा सलवार-कमीज किंवा साडी व ब्लाउज परिधान करणे बंधनकारक आहे.

हा सकारात्मक बदल यापूर्वी राष्ट्रीय स्तरावरील अनेक विद्यापीठांनी स्वीकारला असून, या विद्यापीठानेही मागील दीक्षांत समारंभापासून या वस्त्रसंहितेची अंमलबजावणी सुरू केली आहे. दीक्षांत समारंभाची गरिमा व शोभा वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने समारंभात सहभागी होणाऱ्या इतर सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी, निमंत्रित मान्यवर, अधिकारी व कर्मचारी यांनीदेखील वरीलप्रमाणे वस्त्रसंहितेचे पालन करावे, अशी अपेक्षा आहे.

दीक्षांत दिंडीत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांना प्रदान करण्यात येणारे विद्या वस्त्र (स्टोल) दीक्षांत समारंभाच्या एक दिवस आधी संबंधित विभागाकडून प्राप्त करून घ्यावे.

पत्रकार परिषदेत संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, कुलसचिव श्री. पुरभा काळे, नियंत्रक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपकुलसचिव डॉ. गजानन भालेराव, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री. सुरेश हिवराळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ शंकर गणपत पुरी यांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

राहुल गांधींनी अराजकता निर्माण करण्याऐवजी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी काम करावे

खा. डॉ. अजित गोपछडे यांची टीका; संविधानाचा राजकीय स्वार्थासाठी वापर करू नये – भास्कर आबा दानवे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : लोकशाही वाचवा – अराजकता हटवा अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने सोमवारी (१६ नोव्हेंबर) राष्ट्रचिंतन संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा जालना महानगर प्रभारी खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ११ वाजता ही बैठक पार पडली. यावेळी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, रामेश्वर पाटील भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, सभापती अशोक पांगारकर, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, वसंत शिंदे, सुनील पवार, अरुणाताई जाधव, डॉ. मिसाळ, अर्जुन गेही, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सतीश केरकळ यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्र सरकारच्या विकासकामांचा आढावा घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार कार्यरत असल्याचे सांगितले. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासोबतच विविध शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. मात्र, विरोधकांकडून विविध मुद्द्यांवरून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला जात



आहे. राहुल गांधी यांनी जंतरमंतरवर आंदोलन करून देशात अराजकता निर्माण करण्याऐवजी महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या मदतीसाठी काम करावे, अशी टीका त्यांनी केली.

जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी संविधानाच्या मुद्द्यावरून काँग्रेसवर निशाणा साधला. भारतीय संविधान हे देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक असून प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, न्याय आणि स्वातंत्र्य देणारे आहे. मात्र, काँग्रेसकडून संविधानाचा राजकीय स्वार्थासाठी वापर करून जनतेमध्ये गैरसमज निर्माण केले जात आहेत. संविधानाच्या नावाखाली खोटे कथानक मांडून केंद्र सरकारविरोधात वातावरण तयार करण्याचे प्रयत्न थांबवावेत. संवैधानिक संस्थांशी संबंधित विषयांवर राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून जबाबदारीने भूमिका मांडावी, असे आवाहन दानवे यांनी केले.

बैठकीस नगरसेवक महावीर ढक्का, महेश निकम, रमेश गौरक्षक, कल्याण भदनेकर, शशिकांत घुगे, भगवान चांदोडे, शिवराज नारीयलवाले, संजय पाखरे, सिद्धिविनायक मुळे, सुशीलाताई दानवे, ॲड. रिमा खरात, पूनम स्वामी, सखुबाई पणबिसरे, वर्षा राऊत, सुलोचना गोर्डे, रूपा कुरील, स्नेहलता कामड, पदमा मानधनी, वैशाली बनसोडे, विष्णू डोंगरे, जिवन सले, प्रियंका भूरेवाल, विजय कामड, सोमेश काबलिये, परसराम तळेकर, काकासाहेब घुले, गजानन खरात, सुधाकर खरात, राजाराम जाधव, सिद्धेश्वर हाजबे, प्रा. राजेंद्र भोसले, सुहास मुंडे, विजय पवार, विकास कदम, मनोजकुमार जोशी, संजय भगत, मनोज इंगळे, रवि कायंदे, बद्रीनाथ वाघ, सुमित सुरडकर, करण निकाळजे, निलेश गवळी, कैलास सोळुंके, अजित मानधनी, विठ्ठल इंदलकर, राजेश स्वामी, रोहित भूरेवाल, दत्ता जाधव, सुखदेव महाराज गोरे, हरिभाऊ गोरे, गुलाब पणबिसरे, सुधाकर शिंदे, शाम उगले, महादेव कावळे, संदीप नाईकवाडे, अमोल भवर, विष्णू राठोड, पंकज किल्लेदार, यश खरात आणि अकबर परसुवाले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फिल्टरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची ग्रामस्थांची मागणी



अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील शिवना गावातील पाणी फिल्टरकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही व्यक्तींनी अतिक्रमण केल्यामुळे जाण्या-येण्याचा मार्गच बंद झाला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हे अतिक्रमण तातडीने हटवून रस्ता पूर्णपणे मोकळा करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

यासंदर्भात सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी सिल्लोड येथील उपविभागीय अधिकारी (SDO) यांना ग्रामस्थांच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींचा या जमिनीशी कोणताही कायदेशीर संबंध नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या दाव्याच्या पुष्ट्यर्थ नोंदणीकृत खरेदीखताची प्रत पुरावा म्हणून निवेदनासोबत जोडण्यात आली आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन जागेची प्रत्यक्ष पाहणी करावी व अतिक्रमणाची वस्तुस्थिती तपासून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती आमदार अब्दुल सत्तार, तहसीलदार सिल्लोड, गटविकास अधिकारी आणि पाणीपुरवठा अधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य राजुबाबा काळे, पंचायत समिती सदस्य शेख सलीम शेख भिकन.रावकाका, ग्रामपंचायत सदस्य शामराव होळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीप राऊत, नाना काळे, साहेबराव काळे, जाधव मामा यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज शिवसेनेतर्फे अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज (मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर) सकाळी १० वाजता शिवसेनेतर्फे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जालना रोडवरील अमरप्रीत हॉटेलसमोरील महर्षी दयानंद चौकात हा कार्यक्रम होणार आहे.

शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, शिवसेना नेते तथा आमदार आणि माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच शिवसेना उपनेते सुभाष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, शिवसैनिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सहसंपर्कप्रमुख अनिल चोरडिया, राजेंद्र काळे, विजयराव साळवे, जिल्हा समन्वयक सुदाम सोनवणे, जिल्हा संघटक डॉ. शोएब हाश्मी यांच्यासह उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, विधानसभा पदाधिकारी, महिला आघाडी व युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिमेत परभणी जिल्ह्यात 593 गुन्हे दाखल

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**पोलीस उपमहानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम क्रमांक ५ राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मटका, जुगार, अवैध दारू विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कायद्यांनुसार अवैध व्यवसायांविरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे.या मोहिमेच्या १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायांविरोधात एकूण ५९३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ९०६ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत आरोपींकडून एकूण ९ कोटी ८२ लाख ८१ हजार ३७९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये परभणी जिल्ह्यात अवैध व्यवसायांविरोधात एकूण १ गुन्हा दाखल करण्यात आला असून, २५ हजार ५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच नांदेड जिल्ह्यात २९३, हिंगोली जिल्ह्यात १८७, तर लातूर जिल्ह्यात १२२ कारवाया करण्यात आल्या आहेत.संपूर्ण नांदेड परिक्षेत्रातील कारवाईमध्ये मटका-जुगाराचे ७६ गुन्हे, अवैध दारूविक्रीचे ४१२ गुन्हे, शस्त्र अधिनियमांतर्गत १४ गुन्हे, तर इतर कायद्यांनुसार ८७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमध्ये परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे केलेली वाळूविरुद्धची कारवाई तसेच लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या चंदनविक्रीविरोधातील कारवाईचाही समावेश आहे.'खबर' हेल्पलाइनवर माहिती देण्याचे आवाहन

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी 'खबर' हेल्पलाइनचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांना देण्यासाठी ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. नागरिकांनी या क्रमांकावर माहिती देऊन अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिमेत सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पिच्छी परिवर्तन सोहळ्याने चातुर्मासाची सांगता



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दिगंबर जैन मुनींच्या जीवनात पिच्छीला अनन्यसाधारण महत्त्व असून, ती संयम, अहिंसा आणि साधनेचे प्रतीक आहे. पिच्छीमध्ये असलेले नऊ रंग नवग्रहांचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन आचार्य श्री १०८ हेमसागर महाराज यांनी केले.

आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथील श्री १००८ चंद्रप्रभ भगवान दिगंबर जैन मंदिरात रविवारी (१५ नोव्हेंबर) आचार्य हेमसागर महाराज यांच्या सान्निध्यात भव्य पिच्छी परिवर्तन सोहळा आणि चातुर्मास सांगता महोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी शहरासह जिल्ह्यातील आणि परजिल्ह्यांतील श्रावक-श्राविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुदर्शन व धर्मलाभ घेतला. यावेळी आचार्यश्रींनी पिच्छीचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व विशद केले. जैन मुनी पिच्छीच्या माध्यमातून अहिंसेचे पालन करतात. मुनींच्या संयममय जीवनात पिच्छीला विशेष स्थान असून, ठरावीक कालावधीनंतर तिचे परिवर्तन केले जाते. मुनींना पिच्छी प्रदान करण्याचे सौभाग्य लाभणे हा श्रावकांसाठी पुण्यसंचय आणि गुरुभक्तीचा अनमोल क्षण असतो, असे त्यांनी सांगितले.

सोहळ्याच्या प्रारंभी गुरु आमंत्रण आणि आचार्यश्रींचे मंगल आगमन झाले. त्यानंतर दीपप्रज्वलन, गुरुपूजन आणि पिच्छी परिवर्तन विधी पार पडला.

परभणी जिल्ह्यात 30 नोव्हेंबरपर्यंत जमावबंदी लागू; पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी तसेच संभाव्य आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परभणी जिल्ह्यात १६ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) लागू करण्यात आले आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी आदेश जारी केले आहेत.

२० नोव्हेंबर रोजी संत नामदेव महाराज व टिपू सुलतान जयंती, २४ नोव्हेंबर रोजी गुरुनानक जयंती, तर २८ नोव्हेंबर रोजी महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी आहे. या कार्यक्रमांसह जिल्ह्यात राजकीय पक्ष व विविध संघटनांकडून अचानक मोर्चे, निदर्शने, धरणे, रास्तारोको आदी आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा प्रतिबंधात्मक निर्णय घेतला आहे.

या आदेशानुसार शासकीय कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या परिसरात शस्त्रे, तलवारी, भाले, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या तसेच शारीरिक इजा होऊ शकेल अशा वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दाहक व स्फोटक पदार्थ, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे जवळ बाळगणे, जमा करणे अथवा तयार करणे यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत.

याशिवाय सार्वजनिक ठिकाणी व्यक्ती किंवा मृतदेहांच्या प्रतिमा प्रदर्शित करणे, आरडाओरड करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे तसेच सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता व नीतिमत्तेला बाधा पोहोचविणारी किंवा राज्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी भाषणे, अंगविक्षेप, विडंबन, चित्रे, चिन्हे व फलक यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करण्यास मनाई करण्यात आली आहे.

सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांवर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास तसेच मिरवणुका काढण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तथापि, पोलीस अधिकारी, शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांच्या कर्तव्याशी संबंधित कामकाजाला या आदेशातून सूट देण्यात आली आहे. तसेच विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा आणि सक्षम अधिकाऱ्यांनी विशेष परवानगी दिलेल्या मिरवणुका व कार्यक्रमांनाही हा आदेश लागू राहणार नाही.

विशेष मिरवणुका व कार्यक्रमांना परवानगी देण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, परभणी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

***३० नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत आदेश लागू* :** हा प्रतिबंधात्मक आदेश १६ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून ३० नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण परभणी जिल्ह्यात लागू राहणार आहे.

जिल्ह्यात शांतता, सार्वजनिक सुरक्षितता आणि कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाने जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रिपब्लिकन सेनेच्या परभणी जिल्हा कार्यकारिणीची बैठक संपन्न



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी रविवारी दुपारी १ वाजता सावली रेस्टॉरंट, परभणी येथे रिपब्लिकन सेनेची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली.

या बैठकीस परभणी जिल्हा लोकसभा अध्यक्ष मा. कचरुदादा गोडबोले साहेब व मराठवाडा रिपब्लिकन सेना अध्यक्ष मा. महेंद्र सामके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी संघटनेची कार्यकारिणी समिती स्थापन करण्यात आली तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये मा. कचरुदादा गोडबोले (लोकसभा जिल्हाध्यक्ष), मा. डॉ. सिद्धार्थ वसकर (लोकसभा जिल्हा संघटक), मा. गंगाधर सखाराम सपाटे (शहर परभणी रिपब्लिकन सेना अध्यक्ष), मा. सचिन दत्तात्राव कांबळे (विधानसभा अध्यक्ष) व मा. दानिश दशरथ वाघुळे (लोकसभा उपाध्यक्ष) यांचा समावेश होता.

नवनियुक्त पदाधिकारी :

1. मा. भारत घोडीराम कनकुटे – परभणी लोकसभा उपाध्यक्ष.
2. मा. नितीन नाथाजी वाकुडले – परभणी विधानसभा सहसंघटक.

या नियुक्त्यांमुळे परभणी जिल्ह्यात रिपब्लिकन सेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

क्रांतिवीर बिरसा मुंडा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे 151 वी बिरसा मुंडा जयंती साजरी



हिंगोली : क्रांतिवीर बिरसा मुंडा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, हिंगोली यांच्या वतीने धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सतीश रामकिसन ढाकरे, संस्था सचिव:- अनिल घंगाळे, कोषाध्यक्ष दिलीप गोविंदा गायकवाड, युवा संघर्ष ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष पै. माधव भाऊ सपाटे, कायाधू अमृततुल्यचे संचालक महारुद्र गायकवाड यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा यांनी जल, जंगल आणि जमीन यांसाठी केलेला संघर्ष, आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी दिलेले योगदान आणि त्यांचे क्रांतिकारी विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक एकता, शिक्षण आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

अपस्मार आजार नाही कलंक; योग्य उपचारांनी झटक्यांवर नियंत्रण शक्य!

राष्ट्रीय अपस्मार दिनानिमित्त आरोग्य विभागाचे आवाहन; गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करण्यावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : अपस्मार हा मेंदूशी संबंधित आजार असून तो संसर्गजन्य नाही. योग्य निदान, नियमित औषधोपचार आणि वैद्यकीय मार्गदर्शनामुळे बहुतांश रुग्णांमध्ये झटक्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवणे शक्य आहे. त्यामुळे अपस्माराबाबतचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करून रुग्णांना भेदभावाची वागणूक न देता उपचारासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आरोग्य विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे. १७ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय अपस्मार दिनानिमित्त हे आवाहन करण्यात आले.

अपस्मार हा मेंदूतील विद्युत संदेशांच्या कार्यात असंतुलन निर्माण झाल्यामुळे होणारा आजार आहे. यामुळे रुग्णाला वारंवार झटके येऊ शकतात. मात्र, समाजात या आजाराबाबत अनेक गैरसमज आहेत. अपस्मार झालेल्या व्यक्तीला योग्य उपचार मिळाल्यास ती सामान्य आणि सक्रिय जीवन जगू शकते.

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांच्या माध्यमातून असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध आजारांची लवकर ओळख व निदान करण्यावर भर दिला जात आहे. झटके येणे किंवा वारंवार बेशुद्ध पडणे अशी लक्षणे आढळल्यास संबंधित व्यक्तींनी तातडीने वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. आवश्यकतेनुसार रुग्णांना उच्चस्तरीय आरोग्य संस्थेत उपचारासाठी पाठविण्यात येते.

अपस्माराचा झटका आल्यास रुग्णाला सुरक्षित ठिकाणी झोपवून एका कुशीवर वळवावे. डोक्याला इजा होऊ नये म्हणून मऊ वस्तू ठेवावी आणि झटका किती वेळ सुरू आहे, याची नोंद घ्यावी. झटका पाच मिनिटांपेक्षा जास्त काळ सुरू राहिल्यास किंवा वारंवार झटके आल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. झटका सुरू असताना रुग्णाच्या तोंडात चमचा, बोट, पाणी किंवा अन्य कोणतीही वस्तू घालू नये. तसेच रुग्णाला जबरदस्तीने पकडून ठेवू नये.

अपस्माराचे निदान झालेल्या रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित औषधे घ्यावीत. स्वतःहून औषधे बंद करणे किंवा डोस बदलणे टाळावे. अपस्मार असलेल्या व्यक्तींना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक जीवनात समान संधी मिळणे आवश्यक असून त्यांना सहकार्य व सन्मानाची वागणूक द्यावी. अपस्माराबाबत जनजागृती करून रुग्णांना नियमित उपचार घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

निवृत्तीवेतनधारकांसाठी डिजिटल जीवन प्रमाणपत्राची सुविधा ; लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. 16 (जिमाका) – राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना दरवर्षी 1 ते 30 नोव्हेंबर या कालावधीत हयातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. निवृत्तीवेतनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी केंद्र शासनाच्या डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियानांतर्गत ऑनलाइन पद्धतीने जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या अभियानांतर्गत वरिष्ठ कोषागार कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत 17, 18 व 19 नोव्हेंबर 2026 रोजी सकाळी 11 ते सायंकाळी 5.30 या वेळेत डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही सुविधा पूर्णपणे विनामूल्य असून, निवृत्तीवेतनधारकांना बँका किंवा सेतू केंद्रांमध्ये रांगेत उभे राहण्याचा त्रास टाळता येणार आहे.

जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी वैजनाथ शेळके व सहायक संचालक सुषमा बुरकुले यांनी केले आहे.

तालुका स्तरावरील निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करताना काही अडचणी उद्भवल्यास संबंधित उपकोषागार कार्यालयाशी संपर्क साधता येईल.

डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी येताना निवृत्तीवेतनधारकांनी आधार कार्ड, पीपीओ क्रमांक (PPO No.), मोबाईल क्रमांक व बँक पासबुक सोबत आणावे, असेही वरिष्ठ कोषागार कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

बंगळुरू : टोयोटा किर्लोस्कर मोटरने आज एक महत्त्वपूर्ण कामगिरीची घोषणा केली. कंपनीच्या इनोव्हा हायक्रॉस आणि अर्बन क्रूझर हायरायडर या दोन्ही गाड्यांची एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. टोयोटाच्या स्ट्रॉंग हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकल तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष रस्त्यांवरील क्षमता या कामगिरीतून दिसून आली आहे. वेगवेगळ्या रस्त्यांवर आणि कठीण परिस्थितीत या गाड्यांची चाचणी घेण्यात आली. या दोन्ही गाड्यांनी उत्तम कामगिरी, इंधनाची बचत आणि विश्वासार्हता सिद्ध केली.

राज्यातील 34 हजार न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर

जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी होणार

अहिल्यानगर ;: समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारीही सहभागी होणार आहेत.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मंजूर करून महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावाला २१ महिने उलटूनही शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ३१ जानेवारी २०२५ पासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप कर्मचारी महासंघाने केला आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करून वेतन मिळावे, अशी न्यायालयीन कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. यासंदर्भातील प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मान्य करून शासनाकडे पाठविल्यानंतरही त्यावर निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. समान कामाच्या तत्त्वानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करून न्याय मिळावा, यासाठी महासंघाने आता बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे.

दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने अधिकृत शासन निर्णय काढल्याशिवाय बेमुदत संप मागे घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने घेतली आहे. मागणी मान्य होऊन शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या संपामुळे राज्यातील न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. याबाबतची माहिती अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, उपाध्यक्ष अतुल खरपुडे, राम बेलेकर, प्रशांत साठे आणि अविनाश लिपाने यांनी दिली.

आरती इंडस्ट्रीज चे संस्थापक चेअरमन उद्योगपती चंद्रकांतभाई गोगरी यांचे निधन



सोयगांव,दि.१६ नोव्हेंबर

देश, विदेशात खते व केमिकल क्षेत्रात अग्रेसर असलेल्या आरती इंडस्ट्रीज लिमिटेड समुहाचे चे संस्थापक चेअरमन उद्योगपती चंद्रकांतभाई वल्लभजी गोगरी (वय. ८०) यांचे १५ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील निवासस्थानी निधन झाले होते. आज १६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अंतिम दर्शन घेऊन श्रध्दांजली अर्पण केली.

अंत्ययात्रा पवई (मुंबई) येथील निवासस्थानातून निघाली त्यांच्या निधनामुळे उद्योग क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्चात एक भाऊ,एक बहीण, एक मुलगा ,एक मुलगी व नातवंड असा मोठा परिवार होत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

मंत्री संजय राठोड यांच्याकडून गल्लेबोरगाव व मेहगाव येथील प्रकल्पांची पाहणी व लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर, दि. 16 (जिमाका) – राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव आणि कन्नड तालुक्यातील मेहगाव येथील विविध जलसंधारण प्रकल्पांची पाहणी केली. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या जलसंधारण उपाययोजनांच्या अनुषंगाने या प्रकल्पांची उभारणी करण्यात आली आहे. या पाहणी दौऱ्यात गल्लेबोरगाव येथील द्वारयुक्त सिमेंट नाला बांध, मेहगाव येथील पूलवजा बंधारा तसेच पाझर तलाव क्रमांक 1 या प्रकल्पांचा समावेश होता. यावेळी पूल वजा बंधारा चे लोकार्पण ही मंत्री राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

या दौऱ्यात आमदार विलास भुमरे, आमदार संजना जाधव यांचीही उपस्थिती होती. तसेच मुख्य अभियंता हरिभाऊ गिते, कार्यकारी अभियंता नरेंद्र कटके तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

गल्लेबोरगाव येथील बंधाऱ्यामुळे 16 हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ

खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथे चिंचोली नाल्यावर द्वारयुक्त सिमेंट नाला बांध उभारण्यात आला आहे. या बंधाऱ्याची लांबी २० मीटर, तर उंची २.५ मीटर आहे. प्रकल्पाची एकूण किंमत ८० लाख ८५ हजार रुपये असून, या ठिकाणचे पाणलोट क्षेत्र ४.९० चौरस किलोमीटर आहे. प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता ४९.४७ हजार घनमीटर असून, या बंधाऱ्यामुळे परिसरातील १६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळू शकणार आहे.

या प्रकल्पामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा शेतीसाठी उपयोग करणे शक्य होणार आहे. तसेच भूजल पुनर्भरणास चालना मिळून परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

मेहगाव पाझर तलावातून 34 हजार 193 घनमीटर गाळ काढला

कन्नड तालुक्यातील मेहगाव येथील पाझर तलाव क्रमांक १ चीही मंत्री संजय राठोड यांनी पाहणी केली. या तलावाची पाणी साठवण क्षमता २२१ हजार घनमीटर (TCM) असून, सिंचन क्षमता ४५ हेक्टर आहे.

'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत या तलावातील साचलेला गाळ काढण्याचे काम प्रेरणा फाउंडेशन या संस्थेमार्फत करण्यात आले आहे. सन २०२३-२४ मध्ये तलावातून २२ हजार ७३३ घनमीटर, तर सन २०२४-२५



मध्ये ११ हजार ४६० घनमीटर गाळ काढण्यात आला. अशा प्रकारे दोन वर्षांत एकूण ३४ हजार १९३ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे.

तलावातील गाळ काढल्यामुळे पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित होण्यास मदत झाली आहे. तसेच परिसरातील भूजल पुनर्भरणाला चालना मिळणार आहे. तलावातून काढलेला सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत वापरण्यात आल्यामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास आणि सुपीकता वाढण्यास मदत झाली आहे. त्यामुळे जलसंधारणाबरोबरच शेतीच्या उत्पादनक्षमतेत वाढ होण्याच्या दृष्टीनेही हा उपक्रम उपयुक्त ठरला आहे.

मेहगाव येथील पूलवजा बंधाऱ्यामुळे दळणवळण व सिंचनाची सुविधा

मेहगाव येथील अंजना नदीवर उभारण्यात आलेल्या पूलवजा बंधारा क्रमांक १ चीही मंत्री संजय राठोड यांनी पाहणी केली. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या निधीतून मृद व जलसंधारण विभागामार्फत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या कामासाठी १ कोटी ६८ लाख ६२ हजार रुपये खर्च करण्यात आला असून, सन २०२५-२६ मध्ये हे काम पूर्ण झाले आहे.

या पुलाच्या स्लॅबची लांबी ३१ मीटर, तर रुंदी ६ मीटर असून, त्याला एकूण नऊ आधारस्तंभ आहेत. या प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता ९८.५७ हजार घनमीटर असून, सिंचन क्षमता ३२ हेक्टर आहे.

या प्रकल्पामुळे गावातील शाळकरी मुलांना पावसाळ्यात नदी ओलांडून शाळेत जाण्यासाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध झाला आहे. तसेच नागरिकांची दैनंदिन वाहतूक सुलभ झाली असून, आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य व अन्य अत्यावश्यक सेवा गावापर्यंत पोहोचविणे अधिक सोयीचे झाले आहे.

पूलवजा बंधाऱ्यामुळे नदीपात्रात पावसाळ्यातील पाणी अडवून साठविणे शक्य झाले आहे. त्यामुळे भूजल पुनर्भरणाला चालना मिळणार असून, परिसरातील शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे.

जलसंधारणातून दुष्काळ निवारणाला बळ

गल्लेबोरगाव आणि मेहगाव येथील हे प्रकल्प जलसंधारण, भूजल पुनर्भरण, सिंचन क्षमता वाढ आणि ग्रामीण दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा अधिकाधिक संचय करणे, भूजल पातळीत सुधारणा घडवून आणणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे यासाठी हे प्रकल्प उपयुक्त ठरणार आहेत.

विशेषतः मेहगाव येथील पाझर तलावातील गाळ काढण्याच्या कामामुळे जलसाठ्याचे पुनरुज्जीवन होण्यास मदत झाली आहे. तर पूलवजा बंधाऱ्यामुळे जलसंधारणासोबतच नागरिकांच्या सुरक्षित दळणवळणाची सुविधाही निर्माण झाली आहे.

राज्य कर्करोग संस्थेने राष्ट्रीय स्तरावर निर्माण केली ओळख!

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचे प्रतिपादन; डोके व मान कर्करोग शस्त्रक्रियेच्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय शिबिराचे उद्घाटन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : घाटी रुग्णालयाने राज्यातील अग्रगण्य शासकीय रुग्णालय म्हणून ओळख निर्माण केली असून, शासकीय कर्करोग रुग्णालय अर्थात राज्य कर्करोग संस्थेनेही राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवला आहे, असे प्रतिपादन घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले. घाटी प्रशासन, डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळे हे यश मिळाले आहे. आगामी काळात रुग्णालयात स्वतंत्र रक्तपेढी आणि धर्मशाळा उभारण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य कर्करोग संस्थेत डोके व मान कर्करोग शस्त्रक्रियेवरील



दुसऱ्या आंतरराष्ट्रीय शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. सुक्रे बोलत होते. कर्करोग रुग्णालयात अल्पदरात पेट-स्कॅनसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

गेल्या १४ वर्षांपासून कर्करोग रुग्णालयाची जबाबदारी सांभाळणारे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांनी रुग्णालयाच्या उभारणीपासून आजपर्यंतच्या प्रवासात अनेकांचे योगदान असल्याचे सांगितले. कान-नाक-घसा विभागप्रमुख डॉ. सुनील देशमुख यांनी घाटी प्रशासनाच्या पाठबळामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा व शिबिरे आयोजित करणे शक्य झाल्याचे स्पष्ट केले.

युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन हॉस्पिटल्स एनएचएस ट्रस्ट, यूके येथील प्राध्यापक डॉ. जोनाथन ह्यूज यांनी रुग्णालयातील उपचारपद्धती आणि रुग्णसेवेचे कौतुक केले. रॉयल फ्री हॉस्पिटल, लंडन येथील डॉ. विजेंद्र इंगळे यांनीही घाटी रुग्णालयाबद्दल आत्मीयता व्यक्त केली. अधिष्ठाता डॉ. सुक्रे हे सहकाऱ्यांच्या गरजा जाणून घेऊन कामे मार्गी लावण्यासाठी तत्पर असतात, असे त्यांनी सांगितले.

शिबिरात ११ व्याख्याने; ८ ते १० रुग्णांवर शस्त्रक्रिया

तीन दिवसीय शिबिरात डोके व मान कर्करोग शस्त्रक्रिया या विषयावर एकूण ११ व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. १७ व १८ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ प्रा. डॉ. जोनाथन ह्यूज आणि डॉ. विजेंद्र इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ ते १० रुग्णांवर जटिल शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या शिबिरात शंभरहून अधिक कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉक्टर सहभागी झाले आहेत. शिबिरामुळे निवासी डॉक्टरांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शस्त्रक्रिया तंत्रांचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून, रुग्णांनाही अत्याधुनिक उपचारांचा लाभ होणार आहे.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दर्पण जक्कल, प्रशासकीय अधिकारी डॉ. किशोर सुलाने, डॉ. अजय बोराळकर, डॉ. वसंत पवार, डॉ. प्रफुल्ल जटाळे, मेट्रन मंदाकिनी ठोकळ, डॉ. प्रीतम भगत, डॉ. धनजकर, डॉ. चैतन्य पाटील, डॉ. अतुल पोरे यांच्यासह विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

भटक्या-विमुक्त जमातीतील मुला-मुलींनी शिक्षण घेऊन मुख्य प्रवाहात यावे – मंत्री संजय राठोड

छत्रपती संभाजीनगर, दि. 16 (जिमाका) – भटक्या-विमुक्त जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील मुला-मुलींनी शिक्षणाच्या संधींचा लाभ घेऊन प्रगती साधावी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

येथील कांचनवाडी परिसरातील भटक्या-विमुक्त समाजाच्या वस्त्यांना मंत्री राठोड यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी समाजबांधवांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या व अडचणी जाणून घेतल्या.

या भेटीदरम्यान समाजातील नागरिकांना भेडसावणाऱ्या जात प्रमाणपत्र, आधारकार्ड, जन्मदाखले, निवास, शिक्षण तसेच रोजगारासंबंधीच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आवश्यक शासकीय कागदपत्रांच्या उपलब्धतेसह शिक्षण व रोजगाराच्या संधी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे मंत्री राठोड यांनी सांगितले.

भटक्या-विमुक्त समाजाच्या सामाजिक,



शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी शासन प्रयत्नशील असून समाजाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येत असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

भाऊबीजेच्या निमित्ताने मंत्री राठोड यांच्या हस्ते समाजातील महिलांना शिधावाटप करण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी कलोसे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राजपाल राठोड, महादेव चव्हाण, जगन बाबर, परमेश्वर जाधव यांच्यासह भटक्या-विमुक्त जमातींच्या विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व समाजबांधव उपस्थित होते.

खासदार संदिपान भुमरे यांच्याकडून निलगिरीत विकासकामांची पाहणी

ग्रामपंचायत कार्यालयाला भेट; ग्रामसडक योजनेतील रस्त्याची केली तपासणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

निलगिरी (तामिळनाडू) : संसदेच्या ग्रामीण विकास आणि पंचायती राजविषयक स्थायी समितीचे सदस्य तथा खासदार संदिपान भुमरे हे दक्षिण भारताच्या अभ्यास दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी तामिळनाडूतील निलगिरी जिल्ह्यातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामीण विकास योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

खासदार भुमरे यांनी बुर्लियार ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देऊन ग्रामपंचायतीचे कामकाज, स्थानिक विकासकामे आणि



केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्याची पाहणी करून ग्रामीण भागातील रस्ते व दळणवळण सुविधांची स्थिती जाणून घेतली.

या दौऱ्यात संसदीय स्थायी समितीच्या सर्व खासदार सदस्यांनी निलगिरी येथील प्रसिद्ध पर्यटनस्थळ डॉल्फिन्स नोज येथेही भेट दिली. यावेळी स्थानिक जिल्हाधिकारी, केंद्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि समितीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, ग्रामपंचायतींचे कामकाज आणि केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास योजनांची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा महत्त्वपूर्ण ठरला.

गोरेगावमध्ये पाणीप्रश्नावर महिलांचा घागर मोर्चा; ग्रामपंचायतीत दोन तास ठिय्या आंदोलन

जलजीवन मिशनवर कोट्यवधींचा खर्च करुनही नागरिक तहानलेले; गजानन कावरखे यांचा 23 नोव्हेंबरला तीव्र आंदोलनाचा इशारा

हिंगोली/ गोपाल सातपुते

हिंगोली | गोरेगाव येथे पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून, जलजीवन मिशनअंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च होऊनही गावकऱ्यांना पाणी मिळत नसल्याने संतप्त महिलांनी सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायतीवर घागर मोर्चा काढला. यावेळी महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयात तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रत्येक घराला नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र, गोरेगावमध्ये कोट्यवधींचा खर्च करूनही नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह



उपस्थित होत आहे. योजनेच्या कामांची गुणवत्ता, खर्च आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली.

या आंदोलनाला क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे यांनी जाहीर पाठिंबा देत आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयातून दूरध्वनीद्वारे ग्रामविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायतीचे प्रशासक असलेले विस्तार अधिकारी देशमुख यांच्याशी संपर्क साधून गावातील पाणीप्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली.

यावेळी गजानन कावरखे यांनी, जलजीवन मिशनवर कोट्यवधी रुपये खर्च होऊनही महिलांना पाण्यासाठी घागर मोर्चा काढावा लागत असेल, तर ही गंभीर बाब आहे. संबंधित कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि नागरिकांना तातडीने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली. अन्यथा सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६ रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत प्रश्न असून, महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन जलजीवन मिशनच्या कामांची तपासणी करावी व गावातील पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या आंदोलनात भास्करराव पाटील, संतोष कावरखे, विठ्ठल साळुंखे, कैलास देवकर, राजू देवकर, सुखदेव दादा यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष सहभागी झाले होते.

२३ नोव्हेंबरला आंदोलनाचा इशारा दिल्याने आता प्रशासन गोरेगावचा पाणीप्रश्न किती तत्परतेने सोडवते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

अजिंठा जंगलात वनरक्षक-वनपालांच्या साजिऱ्या 'झोपाळ्यामुळे' मद्यांची धिंगाणा पार्टी

केबिनमध्ये घोरत पडणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे अजिंठा जंगलाची सुरक्षा वाऱ्यावर जळालेली चूल गावठी दारू अन् पत्त्यांच्या डावामुळं वनसंपत्ती धोक्यात

फर्दापूर प्रतिनिधी :

फर्दापूर जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा परिसरातील जंगलात आता प्रशासकीय अकार्यक्षमतेचा कळस गाठला असल्याचे दिसत आहे वनविभागाच्या हद्दीत सुरक्षेची जबाबदारी असलेले रेंजर आणि वनपाल साहेब आपल्या एसी केबिनमध्ये गाढ झोपेत असताना जंगलाच्या पोटात मात्र मद्यांचे आणि जुगाराड्यांचे फावले आहे जंगलाच्या एका निर्जन भागात चूल पेटवून बेकायदेशीर पार्ट्या झोडल्या जात असून घटनास्थळी जळालेली चूल बिसलेरीच्या बाटल्यांमधली गावठी दारू आणि पत्त्यांचा खेळ तात्याचे पत्ते उघड्यावर पडल्याने या lazy कारभाराचा पर्दाफाश झाला आहे





एका ठिणगीने अख्खं जंगल खाक झालं असतं तेव्हा हे 'कुंभकर्णी झोपेतले' अधिकारी काय करत असते

सध्या जंगलात वाळलेला पालापाचोळा आणि कोरडं गवत पसरलेलं असताना या हुल्लडबाजांनी तिथे चूल पेटवून अक्षरश आगीशी खेळ चालवला होता

जर या चुलीवरून किंवा बिडी-सिगारेटच्या ठिणगीवरून संपूर्ण जंगलात वणवा भडकला असता आणि लाखो-कोटींची बहुमूल्य वनसंपत्ती व मुके वन्यजीव जिवंत जळून खाक झाले असते तर याची सगळी नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी कुणाच्या थोबाडीवर फोडायची पगार मात्र जनतेच्या पैशातून फुकट लाटायचे आणि प्रत्यक्षात गस्तीच्या नावाखाली कार्यालयात झोपायचं असाच प्रकार या ठिकाणी सुरू असल्याचा संताप व्यक्त होतोय

रेंजर आणि वनपालांच्या हलगर्जीपणावर संतापाची लाट

जंगलाच्या इतक्या आत सर्रास गावठी दारूच्या पार्ट्या आणि जुगाराचे अड्डे थाटले जात आहेत तरीही संबंधित परिसराची जबाबदारी असणाऱ्या वनरक्षक आणि वनपालांना याची साधी कुणकुण कशी लागली नाही

यावरून हे स्पष्ट होते कि वनविभागाचे हे अधिकारी केवळ कागदोपत्री गस्त दाखवून स्वतःच्या खुर्च्या बळकावून बसले आहेत.

या संपूर्ण हलगर्जीपणाची आणि कुचकामी कारभाराची गंभीर दखल वरिष्ठांनी घेऊन संबंधित रेंजर व वनपालांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी संतप्त नागरिक व वन्यजीवप्रेमींनी केली आहे

शाक्य नगरात विकास योजनेतील आठ बांधकामांवर कारवाई

15 मीटर रुंद प्रस्तावित रस्त्यावरील बांधकामे महानगरपालिकेने हटविली

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शाक्य नगर, भावसिंगपुरा येथील विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित १५ मीटर रुंद रस्त्याच्या बाधित क्षेत्रातील आठ बांधकामे महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकाने सोमवारी निष्कासित केली. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

सर्वे क्रमांक ३२/२ मधील संबंधित बांधकामधारकांना यापूर्वीच महानगरपालिकेकडून नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. नियमानुसार नोटीस प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सोमवारी प्रत्यक्ष निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईवेळी उपायुक्त सविता सोनवणे, झोन क्रमांक १ च्या सहाय्यक आयुक्त लता पुजारी, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय सुरडकर, इमारत निरीक्षक सुंदर खरात, रवींद्र देसाई, शंकर दोडके, अशोक कदम यांच्यासह नागरी मित्र पथक आणि अतिक्रमण हटाव पथकातील कर्मचारी उपस्थित होते. विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते अतिक्रमणमुक्त करून शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी महानगरपालिकेकडून अतिक्रमणविरोधी कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911